महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर– ४१६ ००४.
**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary**
**Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004.**

webside : **www.sscboardkolhapur.in** & **www.mahahsscboard.gov.in**
Phones: Chairman 2690829 [O] 2690679 [R], Secretary 2691405 [O] 2656044 [R].
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758 **E-Mail: divsec.kop@ gmail.com**

परिपत्रक

या परिपत्रका व्दारे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, दिनांक २०/९/२०१९ व दिनांक २१/९/२०१९ रोजीच्या सकाळ वृत्तपत्रात इ.अकरावीच्या परीक्षेसंबधी प्रसिध्द झालेल्या बातमी संदर्भात इयत्ता अकरावी व बारावीच्या सुधारित मूल्यमापन योजने अंतर्गत अभ्यासक्रमाबाबत विषय शिक्षकांचे विभागीयस्तर व तालुकास्तर प्रशिक्षण सुरु आहेत. त्यामध्ये विषयतज्ञ विषयासंबधीच्या सुधारित योजना व प्रश्नपत्रिका आराखडा याची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

क्र.कोविमं/१२वी गोपनीय/1876
कोल्हापूर – ४१६ ००४.
दिनांक : २३ सप्टेंबर,२०१९



# दहावी-बारावीसाठी पुन्हा प्रात्यक्षिक गुण

## शासन निर्णय वर्षभरातच मागे

युवराज पाटील : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : दहावी-बारावीसाठी प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणांची खिरापत पुन्हा सुरू होत आहे. फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनासाठी २० गुण मिळणार आहेत. राज्य शासनाने गेल्या वर्षीच अशाप्रकारचे गुण बंद केले होते. वर्षाच्या आत या निर्णयात बदल करून शासनाने गुण पुन्हा देण्याचा निर्णय घेतला आहे.

बेस्ट ऑफ फाइव्हमुळे दहा वर्षांपासून गुणांचा फुगवटा वाढत गेला. नव्वद ते शंभर टक्क्यांपर्यंत गुण विद्यार्थ्यांना मिळू लागले. दहावीला भरघोस गुण मिळू लागले. साठ ते सत्तर टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेला प्रवेश घेण्याची स्वप्ने पडू लागली. पान २ वर »

### अकरावीची एकदाच परीक्षा

अकरावीची दोन सत्रांत होणारी परीक्षा आता वार्षिक स्वरूपाची असेल. शैक्षणिक वर्ष संपताना पूर्वीप्रमाणे ही परीक्षा होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना सत्र परीक्षा द्यावी लागणार नाही.

" दहावी-बारावीचे प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण पूर्वीप्रमाणे दिले जाणार आहेत. गेल्या वर्षी हे गुण बंद झाले होते. मात्र, २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी गुण पुन्हा दिले जातील. या पद्धतीने प्रश्नपत्रिकेची स्वरूप पूर्णपणे बदलणार आहे. अन्य केंद्रीय बोर्डांचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा असे गुण देत असताना राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी गुण पूर्ववत दिले जाणार आहेत.

– एस. एम. आवारी, सचिव, कोल्हापूर विभागीय परीक्षा मंडळ

दै. सकाळ
दिनांक :- 20/09/2019
पृष्ठ क्रमांक :- 01

दै. सकाळ.
दिनांक :- 20/09/2019
पृष्ठ क्रमांक :- 02

# दहावी-बारावीसाठी पुन्हा प्रात्यक्षिक गुण

» पान १ वरून

पुढे बारावीला मात्र या विद्यार्थ्यांची अडचण होऊन बसायची. क्षमता नसताना अवघड अभ्यासक्रमाला सामोरे जाव लागल्याने ८०,९० टक्क्यांपर्यंत गुण मिळविणारे ७० टक्क्यांपर्यंत खाली आले. अन्य केंद्रीय बोर्ड प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण देत असताना राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय कशासाठी, या हेतूने बेस्ट ऑफ फाइव्हचे सूत्र पुढे आणले गेले. ज्या पाच विषयाला सर्वाधिक गुण मिळायचे, त्याची टक्केवारी गुणपत्रिकेत दिली जायची.

दहावी-बारावीचा विद्यार्थी जसा आहे, तसा तो घडावा. त्याला अतिरिक्त गुण दिल्यास पुढील स्पर्धेत विद्यार्थी टिकत नाहीत, त्यामुळे अंतर्गत परीक्षेचे वीस गुण गेल्या वर्षापासून रद्द झाले. त्याचा परिणाम यंदाच्या निकालावर दिसून आला. निकालाची टक्केवारी आपोआप खाली आली. वीस गुण शाळांच्या हाती असल्याने ते शाळांना जसे हवे तसे दिले जातात. या मागे निकालाची टक्केवारी वाढविणे हाच हेतू होता. शाळेत २० पैकी १८ गुण मिळत असल्याने उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना आणखी १७ गुणांची बेजमी करावी लागत होती. गेल्या वर्षापासून उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ गुण हे विद्यार्थ्यांच्या लिखाणातूनच येऊ लागले. गेल्या वर्षी दहावीचा अभ्यासक्रम बदलला आणि त्यामुळे अनेकांना परीक्षा अवघड गेली. विज्ञान विषयासाठी आता ७०:३०, तर अन्य विषयासाठी ८०:२० असे सूत्र राहील. बारावीला विज्ञान आणि गणित विषयाला प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण दिले जात होते. आता ते अन्य विषयालाही लागू झाले आहेत. पहिले शैक्षणिक सत्र संपत असताना विद्यार्थ्यांना प्रयोगाच्या वह्या पूर्ण करण्याची सूचना दिली आहे. वीस गुण शाळेत मिळणार असल्याने विद्यार्थ्यांत मात्र आनंदाचे वातावरण आहे.

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलले**

विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र या विषयांचे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलले आहे. एकूण गुणाच्या २५ टक्के प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असणार आहेत. प्रश्नपत्रिका अधिकाधिक सोपी करण्याचा प्रयत्न राज्य मंडळाने केला आहे. पूर्वी दहावीच्या प्रश्नपत्रिकेत तीन नववीच्या अभ्यासक्रमावर प्रश्न विचारले जात होते. या वर्षापासून ८० गुणांची प्रश्नपत्रिका केवळ दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल.